REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# संत साहित्याचे सामाजिक आकलन

**प्रा. डॉ. दत्तात्रय बारबोले**
**शं. मो. महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस जि. सोलापूर.**

## प्रस्तावना :



मध्ययुगाच्या उत्तरार्धात म्हणजे १४ व्या शतकात समाज हा सोवळे, ओवळे, कर्मकांड नवससायास, बुवाबाजी, यात खोलवर रुतून बसलेला होता. या अंधश्रध्दांचा बागुलबुवा उभा करत काही प्रवृत्ती समाजाला अधिकच अगळीक करत होत्या. त्याकाळात या अपप्रवृत्तीवर संतांनी प्रखरतेने कोरडे ओढून समाजमन जागृत करण्याचं काम केलं. संताच्या या कार्याकडे सामाजिक दृष्टीकोनातून पाहणे गरजेचे आहे.

संतांनी नियतीवाद शिकविला, त्यांनी समाजाला निष्क्रीय केले असे आरोप करणारे अनेक आहेत. संतांना 'टाळकुटे, देशबुडवे' ही दुषणेही लावली जातात. पण संतानी आपल्या भक्ती मार्गातून समाजमनात जागृती निर्माण केली. या जागृतीतून एकाग्रता साधली गेली आणि या समाजमनाच्या एकाग्रतेतून समतेची, स्वातंत्र्यलढ्याची भावना रुजवली गेली. एवढे मोठे संताचे कार्य आहे.

संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' सारख्या अलौकिक ग्रंथ मराठी भाषेच्या काळात लिहिला. पण त्यांचे कर्तृत्व इथेच संपत नाही. वारकरी संप्रदाची स्थापना करुन महाराष्ट्रातलया सर्व जाती-जमातींना त्यांनी आध्यात्माचा आणि आत्मिक विकासाचा मार्ग खुला केला.

ज्ञानेश्वरानंतर संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाचा जोमाने प्रसार केला. भगवद्भक्तीसाठी कीर्तनासारखे नवे प्रकार त्यांनी रुढ केले. पंढरीच्या वाळवंटावर अनेक जातीजमातीतील वारकरी स्त्री, पुरुष नामदेवाच्या कीर्तनात सहभागी होत असत. समाजातील जातीव्यवस्था मोडणे त्याकाळात ज्ञानदेव - नामदेवांना शक्य नसले तरी अध्यात्मिक पातळीवर त्यांनी जातीभेदाचे निर्मूलन केले. विविध जातीजमातीतील संतांनी वारकरी संप्रदायात जी भर घातली ती महत्वाची आहे. त्यामुळे सगळा समाज हलू - बोलू लागला. संतांनी प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधण्याची जी भूमिका घेतलेली ती सामाजिक बांधिलकीच्या हेतूपूर्तीसाठीच प्रपंच करायला काहीही हरकत नाही, उलट तो नेटकेपणाने कसा करावा याचा वस्तुपाठच संतांनी आपल्या अंभग वाणीतून पसायदानातून पदातून भाष्यग्रंथातून दिली. समजाचे संतुलन ज्या - ज्या गोष्टींमुळे बिघडत होतं, त्या - त्या गोष्टींना संतांनी प्रखर विरोध केला. समाजात बोकाळणाऱ्या अपप्रवृत्तींना त्यांनी आपल्या पाखांडखंडनपर अभंगातून तीव्र विरोध केला.

वर्णव्यवस्थेची धग सर्वच संवेदनशील मनांना जाणवणे स्वाभाविक आहे. संतांना सुध्दा त्याचे चटके बसले होतेच. त्यांच्या अंभगवाणीतून आपल्या यातिन्हीनतेबद्दलचे शल्य या सर्वांनीच प्रकट केले आहे.

"यातिहीन शिंपी अधिकारी कैसा
हा धर्म तयाचा सांगतसे ||" असे नामदेव विचारतात तर सावता माळी -
'भली केली हीन याती
'नाही वाढली महन्ती' || असा
उपरोध प्रकट करतात.

सेता न्हावी -
'नाही माझा अधिकार
यातिहीन मी पामर ||' अशी नम्रता धारण करतात तर तुकाराम -
'बरा देवा कुणबी केला
ना तरी दंभे असतो मेलो ||ङ असा तिक्ष्ण आसूड ओढतात.

या सर्व संतापेक्षा अर्थातच शुद्र संतांचा तळतळाट अधिक भेदक आहे.

'अवघ्या वार्णा माझी || हीन केली याति विटाळङ
अशी हळहळ चोखामेळ्याच्या वाणीतून प्रकट होते.
बंका महाराच्या तोंडून -
येरु म्हणे माझा | जाऊ पाहे प्राण |
यातीसी कारण | नाही मज ||
आम्ही तो जातीचे | आहेती महार |
तुम्ही तो थोर | उंच वर्णा ||

अशी तडफड बाहेर पडते. तर कर्ममेळा

'हीनत्व आम्हासी |
हीनत्व आम्हासी |
हीनत्व आम्हासी |
देवराया ||'

असे विव्हळणे ऐकूण आपलेही काळीज करपून जाते.

सर्वांचा देव एक, भक्तीमार्गही एक, भक्तीची उत्कटता सारखीच. तरी प्रत्यक्षातल्या वर्ण विषमतेच्या झळांनी त्यांची मने पोळून निघाल्याशिवाय राहिली नाहीत.

म्हणजे वर्णव्यवस्थेचा काच ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत सर्व संतांनी सोसला. यातिहीनतेबद्दलचे दु:ख व्यक्त करीत असतानाच त्यांना या अवस्थेत आणून टाकलेल्या व्यवस्थेविरुध्द संतापच खऱ्या अर्थाने आणून टाकलेल्या व्यवस्थेविरुध्द संतापच खऱ्या अर्थाने ते प्रगट करीत होते. वर्णवर्चस्वाची प्रौढी मिरविणाऱ्या ब्राम्हणवर्गातील अहंकार, कर्महीनता व अजागळपण आणि मुख्य म्हणजे दंभ पाहून तर या व्यवस्थेची व्यर्थता त्यांच्या लक्षात येऊन चुकली होती. त्यामुळे तिचेही वाभाडे त्यांनी अत्यंत निर्घुणपणे काढले.

सेना न्हावी, सावता माळी, गोरोबा कुंभार, बंळा महार, चोखोबा, निर्मळा, निळोबा, सोहिरोबा असे कितीतरी वेगवेगळ्या जातीतील संत, वारकरी संप्रदायाला महत्त्वाचे देणे देऊन गेले. त्यांच्या अभंगात स्वत:च्या जातीला दिल्या जाणाऱ्या अन्याय वागणूकीची खंत आहे. स्वत:च्या व्यवसायातील शब्द आणि संकल्पना वापरुन त्यांनी विठ्ठलभक्तीचा प्रपंच उभारला आहे. या सर्वांचे वाङःमयीन कर्तृत्व मोलाचे आहे. विविध जातीतील संतमेळ्यामुळेच वारकरी संप्रदाय मुठभर वरच्या वर्गापुरता न रहाता आख्या महाराष्ट्राचा झाला. या सर्व संतांनी स्वत:च्या अंतकरणात तर आत्मज्ञानाचा दीप लावलाच पण आपल्या जातींनाही ते पंढरीच्या वाळवंटात घेऊन आले. वारकरी संप्रदायाने विविधांगी साहित्य निर्मिती करुन महाराष्ट्राच्या धर्मजीवनात केलेले घ्जागरणङ अभूतपुर्व आहे.

सामाजिक समतेच्या तत्वाला मिळणारा नकार ही तत्कालीन सामाजिक प्रगतीतील मोठीच धोंड होती. स्त्री - पुरुष असमानता किंवा पुरुष दक्षिणचं महात्म्य हीही तत्कालीन समाजात रुजू लागलेली एक अनिष्ठ गोष्ट होती. नाथ, महानुभाव, वारकरी, नागेश, रामदासी या सर्वच संप्रदायांनी अध्यात्मिक क्षेत्रात का होईना, स्त्री पुरुष समान स्तर मिळवून दिला. नाथ संप्रदायातील कामास्येसारख्या योगिनी, महानुभव संप्रदायातील महदासा, बाईसा, आऊसा, यासारख्या सन्यस्त साध्वी, वारकरी संप्रदायातील जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, नागेश संप्रदायातील बदकव्वा आणि रामदासी संप्रदायातील वेणाबाई ही या संदर्भातील काही प्रमुख उदाहरणं. यातील अनेक संतकवयित्रींनी मराठी भाषेतील मौलिक भक्तीसाहित्याची निर्मिती केली आहे. त्यांची आध्यात्मिक साधनाही सत्पुरुषांच्या साधने इतकीच तोलामोलाची आहे.

वर्णव्यवस्था हाही तत्कालीन सामाजिक प्रगतीतील मोठा अडसर होता. वर्णव्यवस्थेचा संबंध समाजातील कर्तव्य व्यवस्थेशी असल्याने आणि कर्तव्य व्यवस्थेचा संबंध समाजातील विविध व्यवस्थांशी असल्यानं वर्णव्यवस्थेचा पुनर्विचार करणं आवश्यक होतं. त्यात निर्माण आलेल्या श्रेष्ठकनिष्ठांच्या कल्पनेमुळे समाजातील संतुलन बिघडू लागलं होतं. महाराष्ट्रातील वारकरी, नाथ-नागेशादी संप्रदायांनी अद्वैतमतांचा स्वीकार केला असला तरी या सर्वच संप्रदायांनी जी मानवतावादी भूमिका स्विकारली होती. तिच्यातूनही सामाजिक बांधिलकीचं उद्दिष्ठ डोकावतं. जीवात्मा नि

परमात्मा यात एकाच चैतन्यतत्वाचं अस्तित्व आहे, ही भूमिका महाराष्ट्रातील जवळपास सर्वच धर्मसंप्रदायांनी स्वीकारली. त्यामुळे नाथ संप्रदायातील पिंड -ब्रम्हांड ऐक्य, वारकरी संप्रदायातील ज्ञानदेवांचा चिद्‌विलासवाद, महानुभाव संप्रदायातील ईश्वराचं घ्संविधानङ नि जोवोध्दरण यासारख्या कल्पानातून सर्व प्राणीमात्रांच्या समानतेविषयीच्या तत्वांचा प्रसार होण्यास साहाय्य झालं. महात्मा बसवेश्वरांच्या घ्कार्य कवे कैलासङ (कर्म हाच कैलास, कोणतंही कर्म पवित्रच असतं) यासारख्या विचारातूनही समतातत्वाचा पुरस्कार झाला. कर्म कोणतंही असो, ते श्रेष्ठ कनिष्ठ नसतं, त्यामुळे ते करणारी माणसंही श्रेष्ठ कनिष्ठ नसतात, या विचाराचा आध्यात्मिक प्रभाव सामाजिक प्रभावापेक्षा पडला. हे मान्य करुनही, सामाजिक संतुलनास व पर्यायायानं समाजातील सहिष्णुता प्रकृतीस तो पोषकच ठरला, हे अमान्य करण्याचं कारण नाही, परस्पर बंधुभावाच्या बृध्दीसाठी हा विचार अत्यंत पोषक ठरला. त्यामुळे विविध जातीचे लोक अत्यंत पोषक ठरला. त्यामुळे विविध जातीचे लोक भक्तीसंप्रदायांच्या समतेच्या ध्वजाखाली एकत्र आले. तेव्हा संताच्या सामाजिक बांधिलकीच्या जाणीवा याला कारणीभूत ठरल्या नाही, असं आपल्याला म्हणता येईल का ?

संतांनी अंधश्रध्दा निर्मूलनाचं कार्य ही सामाजिक बांधिलकीच्या हेतूपोटीच केलं, असं मला वाटतं, सगुणोपासनेतून निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांनाही संतांना सामोरं जावं लागलं. महाराष्ट्रातील सर्वच संप्रदायाचं मूळ अधिष्ठाण निर्गूणोपासना हेच होत. जनसामान्यांच्या आकलनासाठी त्यांना सगुणोपासनेच्या तत्वाचा स्वीकार करावा लागला. पण त्यातूनही काष्ठ, पाषाण, धातू इ. च्या अनेक मूर्तीचा प्रश्न निर्माण झाला व देवत्वाच्या मुळ कल्पनेवर सावट येऊ लागलं. तेव्हा ज्ञानदेवापासून रामदासापर्यंतच्या साऱ्या संतांनी सगुणत्वाच्या मागं निर्गुणत्वच कसं आहे, हे पटवून दिलं, व या संदर्भातले लोकभ्रम नाहीसे केले. त्याहीपुढं जाऊन नवससायास, तीर्थयात्रा, (स्थलमहात्म्य) बुवाबाजी, अनावश्यक कर्मकांड, निरर्थक व्रतवैकल्य यावर संत जेव्हा तुटून पडतात, तेव्हा त्यांना समाजाला एक निकोप, निर्लेप, विवेकाधिष्ठीत अशी जीवनदृष्टी द्यायची असते व या मागची भूमिकाही समाजहीत साधण्याची नि सामाजिक बांधिलकीचीच असते हे कुणीही मान्य करील.

तेव्हा मराठी संताचं अंतिम उद्दिष्ठ पारलौकिक सुख प्राप्त करायचं हे असलं तरी लौकिकाचा विचारही त्यांनी अपरिहार्यपणे सामाजिक बांधिलकीच्या त्यांच्या व्रतामुळे केला. यासाठी त्यांनी तत्कालीन समाज स्थितीचे सुक्ष्म अध्ययन केलं, तिचा पुर्नविचार केला, तिचं समाजहिताधिष्ठीत व विवेकाधिष्ठीन दृष्टीकोनातून पूर्नमूल्यांकन व पुर्नव्यवस्थापन केलं. प्रपंच आणि परमार्थ यांची एकमेकांशी सांगड घालून त्यांनी जनसाधारणांना ऐलतिरावरुन पैलतरी नेलं.

## संदर्भ ग्रंथ :-

१) अ. ना. देशपांडे प्रा. म. वाङःमयाचा इतिहास खंड १ - ४ म. सा. प. पुणे.
२) ब्र. ल. रा. नासिराबादकर - प्रा. म. वाङ्ःमयाचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३) संत साहित्याची सामाजिक फलश्रुती - गं. बा. सरदार.
४) धर्म संप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङ्ःमय - र. बा. मंचरकर.